# स्पेनमधील प्रसिद्ध कथा

अनुवाद
**वैशाली गोखले**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**स्पेनमधील प्रसिद्ध कथा**
वैशाली गोखले

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**
वैशाली विजय गोखले
१००४/२ ब, ए वार्ड,
न्यू महाद्वार रोड, कोल्हापूर
मो. नं. : ७५८८११३०८०

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २५०/-

# स्पेनमधील प्रसिद्ध कथा

स्पेनमधील प्रसिद्ध कथा
स्पेनमधील प्रसिद्ध कथा

# कथानुक्रम


| | | |
|---|---|---|
| १) | नग्न राजा...*(जॉन मेन्युअल)*...................................... | ७ |
| २) | भिकारी आणि फादर...*(मेटियो एलमन)*......................... | १२ |
| ३) | अँडालूशिअन मल्लयुद्ध...*(सेराफिन एस्टेबंज कालड्रोन)*........... | १९ |
| ४) | फादरचे आवडते सूप...*(जॉन वलेरा)*............................ | २५ |
| ५) | देशभक्त राजद्रोही...*(पेडरो ए.डे.एलारकोन)*..................... | २८ |
| ६) | शिल्पकाराची पत्नी..*(एंटोनिया डे टूबा)* ..................... | ४० |
| ७) | नशीबवान मुलगा...*(रेमन डेल वालेक्लेन)*........................ | ५१ |
| ८) | जलपरी...*(रुबेन डोरियो)*........................................ | ५६ |
| ९) | बास्क चे वाक्‌पटुत्व...*(जॉन वलेरा)*............................ | ६२ |
| १०) | तुतारीवादक...*(पेडरो ए.डे.एलारकोन)*............................ | ६७ |
| ११) | आपले चांभारकामच बरे!...*(यूसेबियो ब्लास्को)*................ | ८२ |
| १२) | अखेर तो उडालाच...*(रुबिन डारियो)*.......................... | ८६ |
| १३) | बास्कबीटची अनोखी नोंदवही...*(पेडरो ए.डे.एलारकोन)*.......... | ९२ |
| १४) | बहरलेलं झुडूप...*(कारमैन बरगोस)*............................. | ९९ |
| १५) | हुशारी की लबाडी?...*(युसेबियो ब्लास्को)*..................... | १०५ |
| १६) | गुलाबी मोती...*(एमिलिया पार्डो बजान)*......................... | ११६ |
| १७) | डॉ. पर्टीनेक्स...*(ल्योपोल्डो अलास)*............................ | १२४ |
| १८) | जीवनदायी धबधबा...*(एमिलिया पार्डो बजान)*................... | १३५ |

१९) त्या जोडप्याची कथा...*(एमिलिया पार्डो बजान)*................. १४२

२०) भय...*(रेमन डेल वालेक्लेन)*.................................. १५०

२१) माझे अंत्यसंस्कार ...*('क्लेरिन' ल्योपोल्डो अलास)*.............. १५५

२२) जहागीरदार राजा...*(रुबेन डारियो)*............................ १६७

२३) एक अश्रू काय करू शकतो?...*(आर्टरो रैयीस)*................ १७४

२४) पहिलं प्रेम...*(एमिलिया पार्डो बजान)*............................ १८३

२५) ईव्ह आणि गरीब जनता...*(विसंटे ब्लास्को इवानेज)*........... १९४

✦✦✦

## नग्न राजा

*– जॉन मेन्युअल*

फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे ही! एक राजा होता. या राजाला भेटायला तीन बनेल माणसं आली. ते तिघेही विणकर होते. राजाला भेटून त्यांनी असं सांगितलं की, ते एक खास प्रकारचं वस्त्र विणण्यात तरबेज आहेत. त्या वस्त्राचं वैशिष्ट्य असं होतं की, जो आपल्या वडिलांचा औरस पुत्र असेल, फक्त त्यालाच ते वस्त्र दिसेल. जो आपल्या वडिलांचा औरस पुत्र नसेल – मग भले तो लोकांमध्ये औरस पुत्र म्हणून ओळखला जात असला तरी – त्याला ते कापड अजिबात दिसणार नाही.

हे ऐकून राजा एकदम खूश झाला. त्याच्या मनात विचार चमकून गेला, की त्याच्या राज्यात राहणाऱ्या लोकांपैकी जे त्यांच्या वडिलांचे औरस पुत्र नाहीत, अशांना या योजनेनं वेगळं ओळखून काढणं सोपं होईल. मग त्यांना धमकावून त्यांच्याकडून जादा कर वसूल करता येईल. यातून राज्याच्या खजिन्यात भरपूर भर टाकता येईल. त्याचं कारण म्हणजे 'मूर' जमातीत फक्त औरस पुत्रच वडिलांच्या संपत्तीचे वारसदार मानले जात असत. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी तशा प्रकारच्या वस्त्राची निर्मिती करणं गरजेचं होतं. म्हणून राजानं आपल्या मंत्र्याला, त्या विणकरांना एक वाडा उपलब्ध करून देण्याची आज्ञा केली. मग काय, वाडा दिल्याबरोबर ते विणकर कापड तयार करण्यासाठी त्या वाड्यात राहायला एका पायावर तयार झाले, त्यामुळं राजालाही खूप आनंद झाला.

वाड्याबरोबरच, त्या विणकरांना भरपूर सोनं, चांदी, रेशीम आणि इतरही गरजेच्या वस्तू राजाकडून मिळाल्या. ते सगळं सामान घेऊन ते वाड्यात गेले आणि आपले हातमाग आणि धोटे वगैरे त्यांनी तिथं अशा पद्धतीने ठेवले की, ते पाहणाऱ्याला वाटावं की, ते तिथं रात्रंदिवस काम करताहेत.

असेच काही दिवस गेले अन् त्या तिघांतला एक विणकर राजाकडं आला त्यानं सांगितलं की, ते खास वस्त्र विणायला आता त्यांनी सुरुवात केली आहे. त्या कापडाची वीण, पोत आणि नक्षीकाम यांचं वर्णन करत त्यानं उत्तम हेही सांगितलं की, हे वस्त्र म्हणजे जगातली एक अप्रतिम, अद्वितीय वस्तू ठरणार आहे. ते पाहण्यासाठी त्यानं राजाला त्या वाड्यात येण्याची विनंती केली. मात्र त्याचबरोबर कुणालाही सोबत न घेता एकट्यानंच येण्याची सूचना राजाला करायला तो विसरला नाही.

हे ऐकून राजाचा आनंद गगनात मावेना; पण तरीही त्यानं सावधपणे निर्णय घेतला की आपण स्वत: जाण्यापूर्वी अन्य एखाद्या व्यक्तीचा अनुभवी सल्ला घ्यावा. शिवाय, हे विणकर आपल्याला फसवत तर नाहीयत ना हेही राजाला अजमावायचं होतंच. म्हणून त्यानं लॉर्ड चेंबरलेनला त्या वाड्यात पाठवलं. लॉर्ड चेंबरलेन त्या विणकर कारागिरांना भेटला, तेव्हा त्याला या वस्त्राविषयीची रसभरीत माहिती कारागिरांकडून ऐकायला मिळाली; पण आपल्याला प्रत्यक्षात ते वस्त्र दिसलंच नाही असं स्वत:च्या मनाशीही कबूल करायचं धाडस मात्र त्याला झालं नाही. तो राजाकडं परत आला आणि आपण ते वस्त्र पाहिलं असल्याची माहिती त्यानं राजाला दिली. तरी तेवढ्यावर राजाचं समाधान झालंच नाही. त्यानं आणखी एका माणसाला वाड्यात पाठवलं; पण त्यानंही राजाकडं परत येऊन तशीच माहिती सांगितली. त्यानंतरही बऱ्याच माणसांना ते वस्त्र पाहायला राजानं वाड्यात पाठवलं. त्या सर्वांनी एकमुखानं सांगितलं की, त्यांनी ते कापड पाहिलं आहे. शेवटी राजाच्या मनाची खात्री पटली आणि त्यानं त्या वाड्यात जायचा निर्णय घेतला.

राजानं वाड्यात जाऊन पाहिलं तेव्हा त्याला ते विणकर काम करताना दिसले. मागावर धोटा फिरवून ते काम करत होते त्यांनी राजाला त्या कापडाची उत्कृष्ट प्रत, विणण्याची प्रक्रिया सर्व सविस्तर वर्णन करून सांगितलं. त्याशिवाय वस्त्राचा रंग, नक्षीकाम याविषयीची माहितीही त्यांनी दिली. हे सांगतानाही जणू ते वस्त्र विणताहेत अशाच त्यांच्या हालचाली चालल्या होत्या. त्यामुळं प्रत्यक्षात जरी ते कुठलंच वस्त्र विणत नसले तरी राजाला ते काम करताना मात्र दिसत होते. त्यांच्याकडून त्या वस्त्राच्या उत्तम दर्जाबद्दलचं वर्णन राजा ऐकत होता आणि

ज्यांना ज्यांना त्यानं वस्त्र पाहायला पाठवलं होतं, त्यांच्याकडूनही ते वस्त्र दिसल्याची ग्वाही मिळाली असली, तरीही प्रत्यक्षात राजाला मात्र ते वस्त्र मुळीच दिसत नव्हतं. हे पाहून राजा मनातून खूपच बेचैन झाला. त्याला भीती वाटली की, ज्या राजन – पित्याचा औरस पुत्र मी मानला जातो, ते माझे खरे पिता नाहीत की काय? कारण ज्या अर्थी मला ते कापड दिसत नाहीय, त्याअर्थी मला हे राज्य, हे सिंहासन गमवावं लागणार की काय? पण लगेचच तो सावरला आणि त्या वस्त्राविषयी जी गौरवास्पद माहिती त्याला देण्यात आली होती, त्याबद्दल प्रशंसा करत तो त्या कारागिरांच्या बोलण्याला दुजोरा देत गेला.

महालात परत आल्यावरही त्यानं आपल्या सहकाऱ्यांना सांगायला सुरुवात केली की, ते वस्त्र फारच सुंदर आणि आश्चर्यजनक होतं; पण तरीही मनात कुठंतरी 'यात काहीतरी गडबड आहे' असंच वाटत राहिलं.

असेच दोन – तीन दिवस गेले. एक दिवस राजानं या सगळ्याची शहानिशा करण्यासाठी आपल्या न्याय – विभागातल्या अधिकाऱ्याला सांगितलं की, त्यानं स्वत: जाऊन ते वस्त्र पाहून यावं. न्याय विभागातला हा अधिकारी जेव्हा त्या वाड्यात गेला, तेव्हा त्या कारागिरांनी त्यालाही त्या वस्त्राच्या देखण्या स्वरूपाविषयी व त्यावरच्या नक्षीकामाविषयी माहिती दिली आणि राजानंही हे वस्त्र पाहिल्याचं आवर्जून सांगितलं; पण तरीही न्यायाधिकाऱ्यालाही तिथं कसलंच वस्त्र दिसलं नाही; पण त्यालाही असंच वाटलं की, कदाचित तो त्याच्या तथाकथित वडिलांचा औरस पुत्र नसल्यामुळंच त्याला ते वस्त्र दिसलं नसेल. या कल्पनेनंच त्याला घाम फुटला. त्यानं ओळखलं की, त्यानं जर वस्त्र दिसलं नसल्याचं जाहीर केलं तर त्याला त्याचं न्यायाधिकाऱ्याचं पद सोडावं लागेल. हे संकट टाळण्यासाठी मग त्यानंही त्या वस्त्राची तोंड फाटेपर्यंत स्तुती करायला सुरुवात केली.

न्यायाधिकारी राजाकडं आला. त्यानं राजाला सांगितलं की त्यानं ते वस्त्र जवळून पाहिलं आणि खरोखरच ते जगातलं अजोड उत्पादन आहे. हे ऐकून तर राजा पुरताच हबकला. त्याला या विचारानं पुरतं पछाडलं की, या न्यायाधिकाऱ्यालाही ते वस्त्र दिसलं, तर मग मी माझ्या राजन पित्याचा औरस पुत्र नसेन का? अशी आपली नाचक्की होऊ नये म्हणून मग त्यानंही त्या वस्त्राच्या

उत्तम प्रतीची वाखाणणी करायला सुरुवात केली. त्याचबरोबर ते वस्त्र विणणाऱ्या कारागिरांचीही स्तुती तो करायला लागला; पण मनातनं तो घाबरला होता.

दुसऱ्या दिवशी राजानं दरबारातल्या एका मानकऱ्याला ते वस्त्र पाहायला धाडलं. त्या मानकऱ्याच्या मात्र हे लक्षात आलं की, आत्तापर्यंत राजानं पाठवलेल्या सगळ्या माणसांनी स्वत:ला, राजाला आणि इतरांनाही धडधडीत खोटं सांगून फसवलं होतं. आत्तापर्यंत इतकी माणसं या वाड्यातलं वस्त्र पाहायला आली; पण आपल्याला ते दिसलं नाही, हे सांगण्याचं धाडस मात्र कुणीच दाखवलं नव्हतं.

महाभोजनाचा दिवस उजाडेपर्यंत असंख्य माणसं वस्त्र पाहायला गेली; ते कोणालाही दिसलं नाही तरी भयापोटी त्याची प्रशंसा करत राहिली. महाभोजनाचा दिवस उजाडला. लोकांनी राजाला विनंती केली की, त्या दिवशी राजानं त्या अद्भुत वस्त्राचा पोषाख धारण करावा. राजाच्या आज्ञेप्रमाणे कारागीर त्या महान वस्त्राचे सुशोभित तागे घेऊन हजर झाले. त्या ताग्यातलं किती कापड राजाच्या पोषाखासाठी लागेल हे विचारू लागले. राजानं त्यांना सांगितलं की, आवश्यक तेवढं कापड कापा. त्याचबरोबर तो पोषाख कशा तऱ्हेनं शिवायचा याच्या सूचनाही राजानं दिल्या.

पोषाख जेव्हा तयार झाला आणि महाभोजनाचा दिवस उजाडला, तेव्हा तो पोषाख मानानं तबकात ठेवून कारागीर राजाच्या पुढ्यात हजर झाले. त्यांनी वर्दी दिली की, त्या अद्भुत कापडाचा पोषाख राजाच्या आज्ञेबरहुकूम तयार झाला आहे. हे सगळं घडत असतानाही आपल्याला तो पोषाख दिसत नाहीय हे सांगण्याचं धाडस मात्र राजाला झालंच नाही.

नंतर राजानं तो पोषाख घातल्याचा आविर्भाव केला आणि घोड्याच्या पाठीवर स्वार होऊन तो नगराकडे जाऊ लागला. राजाचं नशीब मात्र यावेळी बलवत्तर होतं म्हणायला हवं; कारण त्यावेळी उन्हाळ्याचे दिवस होते. त्या अवतारात राजाला येताना पाहून लोक खरं तर अस्वस्थ झाले होते; पण ज्याला कुणाला राजाचे कपडे दिसणार नाहीत, तो आपल्या वडिलांचा औरस पुत्र ठरणार नाही आणि ही गोष्ट फारच नामुष्कीजनक होईल, हे ओळखून त्यांनी आपली अस्वस्थता मनातच दडवून ठेवली.